## डॉ. उडुपी प्रभाकर राव यांचे निधन



**डोंबिवली :** डोंबिवलीत पहिले रुग्णालय सुरू करणारे, ज्येष्ठ शल्यविशारद डॉ. उडुपी प्रभाकर राव यांचे शुक्रवारी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, त्यांचा वैद्यकीय वारसा पुढे नेणारे डॉ. प्रदीप, डॉ. प्रशांत आणि डॉ. प्रमोद राव, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

राव डॉक्टर या नावाने डोंबिवलीकरांशी त्यांचे अतूट नाते होते. कर्नाटक राज्यातील शिमोगा जिल्ह्यातील तीर्थहळ्ळी गावात राव यांचा जन्म झाला. पदव्युत्तर शल्यविशारद शिक्षणासाठी डॉ. राव मुंबईत आले. सामाजिक सेवेचा पिंड जन्मजात असल्याने तो त्यांनी आयुष्यभर वैद्यकीय सेवेच्या माध्यमातून जपला.

दिवंगत डॉ. वेणीमाधव उपासनींच्या सहकार्याने डॉ. राव डोंबिवलीत आले. डॉ. राव यांनी डोंबिवलीत पहिले रुग्णालय सुरू केले. मुंबई विद्यापीठ विद्वत सभा, वैद्यकीय संस्थांची अनेक मानाची पदे त्यांनी भूषवली. डोंबिवलीतील पेंढरकर महाविद्यालय, डोंबिवली जिमखाना उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. धन्वंतरी, आरोग्य सेवाव्रती, डोंबिवलीभूषण अशा अनेक पुरस्कारांचे ते मानकरी होते.

# मोदींसाठी योगी पुन्हा मुख्यमंत्री होणे आवश्यक - अमित शहा

वृत्तसंस्था, लखनऊ







**पंतप्रधान नरेंद्र** मोदी जर २०२४ मध्ये पुन्हा पंतप्रधान व्हावेत असे वाटत असेल, तर उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रिपदी पुन्हा योगी आदित्यनाथ असावे लागतील, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केले आहे. भाजपचे मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार आगामी विधानसभेत योगी आदित्यनाथ असतील असे संकेत त्यांनी दिले आहेत.

शहा म्हणाले की, २०२२ मधील उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुका हा २०२४ मधील लोकसभा निवडणुकीतील भाजपच्या विजयाचा पाया ठरतील. शहा यांनी भाजप सदस्यत्व मोहिमेची सुरुवात करताना उत्तर प्रदेशात मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार कोण असेल, याबाबत असलेल्या चर्चांना पूर्णविराम दिला. पक्षाच्या शक्ती केंद्र समन्वयकांपुढे त्यांनी डेफेन्स एक्स्पो मैदानावर झालेल्या कार्यक्रमात सांगितले की, 'मेरा परिवार, भाजप परिवार' ही यापुढे आमची घोषणा राहील.

विरोधी पक्षांची सरकारे कौटुंबिक पातळीवर चालत होती, अशी टीका भाजप नेहमी करीत आला आहे. शहा म्हणाले की, मोदी पंतप्रधान असताना त्यांनी उत्तर प्रदेशला सर्व काही दिले आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या विजयाचा पाया हा मोदी यांच्या नेतृत्वाखाली २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत घातला जाणार आहे. २०२४ मध्ये मोदी पंतप्रधान व्हावे असे वाटत असेल, तर उत्तर प्रदेशात २०२२ मध्ये योगी आदित्यनाथ मुख्यमंत्री झाले पाहिजेत. ही निवडणूक भारताला विश्वगुरू बनवणारी असेल, असे सांगून ते म्हणाले की, दिवाळीनंतर प्रचाराला वेग येईल. पक्ष कार्यकर्त्यांनी कामाला लागावे. कमळाचा ध्वज घेऊन फिरावे. विरोधी पक्षांना आता भाजपची भीती वाटत आहे. उत्तर प्रदेशात भाजपला किमान तीनशे जागा मिळाल्या पाहिजेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

ते म्हणाले की, २०१७ मध्ये भाजप सत्तेवर आला. त्याआधी मुघलांची सत्ता असल्यासारखेच होते. उत्तर प्रदेश ही बाबा विश्वनाथ, भगवान राम व भगवान कृष्ण यांची भूमी आहे, याची जाणीव तेव्हा कुणालाच झाली नाही. आमच्या पक्षाने राज्याला खरी ओळख मिळवून दिली. सरकारे कुटुंबासाठी नसतात तर गरिबांची सेवा करण्यासाठी असतात, हे भाजपने दाखवून दिले.

### अखिलेश यादव लक्ष्य

**समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांच्यावर टीका करताना ते म्हणाले की, काही लोक घरात बसले होते, आता निवडणुका येताच नवे कपडे घालून बाहेर पडले आहेत व आम्हीच सरकार स्थापन करू असे सांगत आहेत. अखिलेश यादव यांनी त्यांच्या पाच वर्षांच्या राजवटीत ते किती काळ परदेशात राहिले याचा हिशेब लोकांना द्यावा. या लोकांनी त्यांच्यासाठी, कुटुंबासाठी सत्ता राबवली. त्यांचे विचार व्यापक नसून त्यांनी जातीपुरते राजकारण केले. १९९० मध्ये अयोध्येत कारसेवकांवर गोळीबार करण्यात आला, त्या वेळी मुलायम सिंह यांची राजवट होती.**

# सरकारनेच पेगॅसस स्पायवेअर खरेदी केल्याची शक्यता

## काँग्रेसनेते पी. चिदंबरम यांचा दावा

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

**पेगॅसस हेरगिरीप्रकरणी** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पी. चिदंबरम यांनी केंद्र सरकारवर टीका केली असून यातील स्पायवेअर हे सरकारनेच खरेदी केल्याची शक्यता ठामपणे वर्तवली आहे. त्यांनी हे वक्तव्य इस्रायली राजदूतांच्या वक्तव्याआधारे केले आहे.

इस्रायलची एनएसओ ही संस्था खासगी आस्थापनांना स्पायवेअरची विक्री करीत नाही असे राजदूतांनी म्हटले आहे. याचाच अर्थ हे स्पायवेअर सरकारने खरेदी केले असा होत असल्याचे चिदंबरम यांनी म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी याप्रकरणी चौकशी करण्याकरिता स्वतंत्र तज्ज्ञ समिती नेमली आहे. यात सरकारने इस्रायली स्पायवेअरचा गैरवापर केला किंवा नाही याचा शोध घेतला जाणार आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली कुणावरही पाळत ठेवण्याचा मुक्त परवाना सरकारला नाही. या स्पायवेअरच्या प्रकरणात आपण मूक प्रेक्षक बनू शकत नाही असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

चिदंबरम यांनी म्हटले आहे, की सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा शहाणपणाचा व धाडसी आहे, त्यामुळे या प्रकरणातील पहिला सांगाडा बाहेर पडला आहे.

काल इस्रायलच्या राजदूतांनीही एनएसओ समूह हे स्पायवेअर कुठल्याही देशाच्या सरकारलाच विकते, खासगी आस्थापनांना विकत नाही असे म्हटले आहे. त्यामुळे हे स्पायवेअर भारत सरकारनेच खरेदी केले असा त्याचा अर्थ होतो, असे चिदंबरम यांनी म्हटले आहे.

पेगॅसस सॉफ्टवेअर भारत सरकारने खरेदी केले हे दूरसंचार मंत्री मान्य करणार का, असा सवालही त्यांनी केला आहे. जर सरकार यावर शांत राहिले तर तो सरकारच्या प्रगती पुस्तकातील एक ठपका असेल असेही चिदंबरम यांनी म्हटले आहे.

एनएसओ किंवा तत्सम कंपन्यांना निर्यात परवाना असावा लागतो. कुठल्याही देशाच्या सरकारला निर्यात करायची असेल तरच हा परवाना दिला जातो, असे इस्रायलचे नवनियुक्त राजदूत नाओर गिलोन यांनी म्हटले आहे.

त्यांनी सांगितले,की एनएसओ सारख्या कंपन्यांना त्यांची उत्पादने बिगर सरकारी आस्थापनांना विकता येत नाहीत.

लोकसत्ता दिवाळी २०२१



पिकलं पान, देठ हिरवा
❖ पी. जी. वुडहाऊस
अनुवाद : शांता गोखले
प्रसिद्ध झाला . . .

# भिवंडीत चाकूहल्ल्यात दोघांचा मृत्यू, चार जखमी

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे :** भिवंडी येथील गैबीनगर भागात शुक्रवारी मोहम्मद अन्सारूलहक अन्सारी (४६) याने पूर्ववैमनस्यातून केलेल्या चाकूहल्ल्यात दोघांचा मृत्यू ओढवला, तर चार जण जखमी झाले. याप्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अन्सारी याला अटक करण्यात आली आहे.

या हल्ल्यात कमरूजमा अन्सारी (४३) आणि इम्तियाज खान (३५) यांचा मृत्यू झाला आहे, तर कमरूजमा यांची पत्नी हसीना (३६), मुलगा रेहान (१५), मुली अरिबा (१६) आणि हफिफा (११) या जखमी झाल्या आहेत. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

गैबीनगर येथील खान चाळीत कमरूजमा हा कुटुंबीयांसह राहत होता. त्याच्या शेजारीच आरोपी मोहम्मद अन्सारी हादेखील राहतो. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी कमरूजमा यांची पत्नी हसीना आणि मोहम्मद अन्सारी या दोघांमध्ये वाद झाला होता. याचा राग अन्सारी याच्या मनात होता. शुक्रवारी सकाळी ११ च्या सुमारास कमरूजमा हे घराबाहेर उभे असताना अन्सारी तेथे आला. त्याने कमरूजमा यांच्या छातीत चाकूचा वार केला. कमरूजमा यांच्या बचावासाठी त्यांची पत्नी हसीना, मुलगा रेहान, मुली अरिबा, हफिफा आणि शेजारी राहणारा इम्तियाज हे आले. अन्सारी याने इम्तियाज यांच्याही छातीत चाकू खुपसला. तर हसीना, रेहान, अरिबा आणि हफिफा यांच्यावरही हल्ला केला. इम्तियाज यांचा जागीच मृत्यू झाला. रहिवाशांनी अन्सारी याला पकडले. तसेच कमरूजमा आणि त्यांच्या कुटुंबीयांना खासगी रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान कमरूजमा यांचा मृत्यू झाला.

# मुंबईत पदपथांवरील दोन हत्यांप्रकरणी आरोपी अटकेत

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**मुंबई :** पदपथावर झोपलेल्या दोघांच्या डोक्यात पेव्हर ब्लॉक घालून त्यांची निर्घृण हत्या केल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी सुरेश शंकर गौडा (४०) याला अटक केली आहे. या हत्या १५ मिनिटांच्या कालावधीत आणि दीड किलोमिटरच्या परिसरात झाल्या होत्या.

भायखळा पूर्वेकडील फ्रुट मार्केटच्या पदपथावर झोपलेल्या एका व्यक्तीची शनिवारी सायंकाळी हत्या करण्यात आली होती. पुढे सर जे. जे. मार्ग परिसरात अशाच प्रकारे पदपथावर झोपलेल्या आणखी एकाची पेव्हर ब्लॉकने हत्या करण्यात आली होती. भायखळा आणि सर जे. जे. मार्ग पोलिसांनी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करून तपास सुरू केला होता. याच दरम्यान, भायखळा येथे लोकलने उतरलेली व्यक्ती या मार्गाने चालत येताना हत्या करत असल्याचे चित्रीकरण सर जे. जे. मार्ग पोलिसांच्या हाती लागले होते. पोलिसांनी पायधुनी, मोहम्मद अली रोड परिसर पिंजून काढत येथील पदपथावर वास्तव्य करत असलेल्या गौडा याला ताब्यात घेतले. हत्या केलेल्या दोघांनाही ओळखत नसून त्यांना विनाकारण मारले असल्याचे त्याने पोलीस चौकशीत सांगितले.

गौडाने २०१५ मध्ये कुर्ला येथे पदपथावर झोपलेल्या व्यक्तीची अशाच प्रकारेच दगडाने ठेचून हत्या केली. मात्र सबळ पुराव्यांअभावी २०१६ मध्ये तो तुरुंगाबाहेर आला. सर जे. जे. मार्ग पोलिसांनी गौडा याला अटक केली आहे. दरम्यान, २०१६ नंतर मुंबईत घडलेल्या आणि उकल न झालेल्या अशा सर्वच हत्यांचा पुन्हा तपास करण्यात येणार आहे.

# डॉ. दाभोलकर हत्या खटल्यात आठ वर्षांनी पहिली साक्ष

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणातील पहिल्या साक्षीदाराची साक्ष शुक्रवारी विशेष न्यायालयात नोंदविण्यात आली. आठ वर्षांपूर्वी डॉ. दाभोलकर यांची हत्या झाली होती. त्यानंतर या खटल्याच्या प्रत्यक्ष कामकाजास सुरूवात झाली.

डॉ. दाभोलकर हत्या प्रकरण खटल्याचे कामकाज विशेष न्यायाधीश एस. आर. नावंदर यांच्या न्यायालयात सुरू आहे. डॉ. दाभोलकर आठवड्यातून दोन ते तीन दिवस सदाशिव पेठेतील एका सदनिकेत वास्तव्यास असायचे.डॉ. दाभोलकर यांच्या घरातून काही कागदपत्रे तपासासाठी ताब्यात घेण्यात आली होती. त्या वेळी डॉ. दाभोलकर वास्तव्यास असलेल्या इमारतीतील शेजारी अविनाश दावलभक्त यांना पोलिसांना पंच केले होते. शुक्रवारी दावलभक्त यांची साक्ष नोंदविण्यात आली, अशी माहिती केंद्रीय गुन्हे विभागाचे (सीबीआय) विशेष सरकारी वकील अ‍ॅड. प्रकाश सूर्यवंशी यांनी दिली.

पोलिसांनी माझ्यासमोर सदनिकेत पंचनामा केला. पुस्तके, डायरी, कपडे असे साहित्य ताब्यात घेतले होते, असे दावलभक्त यांनी न्यायालयात सांगितले. हे साहित्य दावलभक्त यांनी न्यायालयात ओळखले.

## रिलायन्स रिटेल अ‍ॅण्ड फॅशन लाईफस्टाईल लिमिटेड

CIN: U52609MH2020PLC343627
नोंदणीकृत कार्यालय: ४था मजला, कोर्ट हाऊस, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई – ४०० ००२. महाराष्ट्र
दूरध्वनी: +९१ २२ ३५५५३८०० • ई–मेल: Sridhar.Kothandaraman@ril.com

**कंपनी योजना याचिका क्र. सीए (सीएए) क्र.०९/एमबी/२०२१**

**फ्युचर कंझ्युमर लिमिटेड, फ्युचर लाईफस्टाईल फॅशन्स लिमिटेड, फ्युचर मार्केट नेटवर्कस लिमिटेड, फ्युचर रिटेल लिमिटेड, फ्युचर सप्लाय चेन सोल्यूशन्स लिमिटेड, फ्युचरबाजार इंडिया लिमिटेड, अ‍ॅक्युट रिटेल इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड, बासुती सेल्स अ‍ॅण्ड ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड, ब्रॅटल फुडस प्रायव्हेट लिमिटेड, चिराग ऑपरेटिंग लीज कं. प्रायव्हेट लिमिटेड, हरे कृष्णा ऑपरेटिंग लीज प्रायव्हेट लिमिटेड, नाईस टेक्सकोट ट्रेडिंग अ‍ॅण्ड एजन्सी प्रायव्हेट लिमिटेड, निष्ता मॉल मॅनेजमेंट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, ओजस ट्रेडलीज अ‍ॅण्ड मॉल मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड, प्रिसिजन रिअ‍ॅल्टी डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड, रिवाझ ट्रेड व्हेन्चर्स प्रायव्हेट लिमिटेड, सिंटेक्स ट्रेडिंग अ‍ॅण्ड एजन्सी प्रायव्हेट लिमिटेड, टॅक्युटो लीज ऑपरेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, युनिक मॉल्स प्रायव्हेट लिमिटेड, फ्युचर एंटरप्रायझेस लिमिटेड आणि त्यांचे संबंधित भागधारक व क्रेडिटर्स (''भाग १'') आणि फ्युचर एंटरप्रायझेस लिमिटेड व रिलायन्स रिटेल व्हेन्चर्स लिमिटेड व त्यांचे संबंधित भागधारक व क्रेडिटर्स (''भाग २'') आणि फ्युचर एंटरप्रायझेस लिमिटेड आणि रिलायन्स रिटेल अ‍ॅण्ड फॅशन लाईफस्टाईल लिमिटेड व त्यांचे संबंधित भागधारक व क्रेडिटर्स (''भाग ३'') यांच्यातील एकत्रित योजनेच्या व्यवस्थेच्या प्रकरणी**

रिलायन्स रिटेल अ‍ॅण्ड फॅशन लाईफस्टाईल लिमिटेड, कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत नोंदणी करण्यात आलेली कंपनी जिचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक: U52609MH2020PLC343627 आहे आणि तिचे नोंदणीकृत कार्यालय ४था मजला, कोर्ट हाऊस, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई – ४०० ००२, महाराष्ट्र, भारत येथे आहे. ) ... दुसरी याचिकाकर्ता कंपनी

### दुसरी याचिकाकर्ता कंपनीचे इक्विटी भागधारक यांच्या सूचनेची सूचना व जाहिरात

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायासनाच्या (**''न्यायासन''**) मुंबई खंडपीठाने आपल्या दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१ च्या आदेशान्वये (**''न्यायासनाचा आदेश''**), कंपनी कायदा, २०१३ (**''कायदा''**) मधील कलम २३० ते २३२ आणि इतर लागू तरतुदींच्या अंतर्गत फ्युचर कंझ्युमर लिमिटेड, फ्युचर लाईफस्टाईल फॅशन्स लिमिटेड, फ्युचर मार्केट नेटवर्कस लिमिटेड, फ्युचर रिटेल लिमिटेड, फ्युचर सप्लाय चेन सोल्यूशन्स लिमिटेड, फ्युचरबाजार इंडिया लिमिटेड, अ‍ॅक्युट रिटेल इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड, बासुती सेल्स अ‍ॅण्ड ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड, ब्रॅटल फुडस प्रायव्हेट लिमिटेड, चिराग ऑपरेटिंग लीज कं. प्रायव्हेट लिमिटेड, हरे कृष्णा ऑपरेटिंग लीज प्रायव्हेट लिमिटेड, नाईस टेक्सकोट ट्रेडिंग अ‍ॅण्ड एजन्सी प्रायव्हेट लिमिटेड, निष्ता मॉल मॅनेजमेंट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, ओजस ट्रेडलीज अ‍ॅण्ड मॉल मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड, प्रिसिजन रिअ‍ॅल्टी डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड, रिवाझ ट्रेड व्हेन्चर्स प्रायव्हेट लिमिटेड, सिंटेक्स ट्रेडिंग अ‍ॅण्ड एजन्सी प्रायव्हेट लिमिटेड, टॅक्युटो लीज ऑपरेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, युनिक मॉल्स प्रायव्हेट लिमिटेड, फ्युचर एंटरप्रायझेस लिमिटेड आणि त्यांचे संबंधित भागधारक व क्रेडिटर्स आणि फ्युचर एंटरप्रायझेस लिमिटेड व रिलायन्स रिटेल व्हेन्चर्स लिमिटेड व त्यांचे संबंधित भागधारक व क्रेडिटर्स, फ्युचर एंटरप्रायझेस लिमिटेड आणि रिलायन्स रिटेल अ‍ॅण्ड फॅशन लाईफस्टाईल लिमिटेड व त्यांचे संबंधित भागधारक व क्रेडिटर्स यांच्यातील प्रस्तावित एकत्रित योजनेच्या व्यवस्थेवर (**''योजना''**) विचार करण्यासाठी, आणि योग्य वाटल्यास, बदलांसह किंवा त्याशिवाय, त्यास मंजुरी देण्यासाठी, मंगळवार, ३० नोव्हेंबर, २०२१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता (भाप्रवेळ) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (**''व्हीसी''**) आणि इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे (**''ओएव्हीएम''**) दुसऱ्या याचिकाकर्ता कंपनीच्या इक्विटी भागधारकांची सभा बोलाविण्याचे आदेश दिले आहेत.

योजनेची प्रत, कायद्यातील कलम १०२ आणि कायद्यातील इतर लागू तरतुदींसोबत वाचले असता कलम २३० ते २३२ अन्वये आणि कंपन्या (समझोते, व्यवस्था आणि विलिनिकरण) नियम, २०१६ (**''सीएए नियम''**) मधील नियम ६ अन्वये विवरण आणि सोबतचे इतर दस्तऐवज केफिन टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड, दुसऱ्या याचिकाकर्ता कंपनीचे रजिस्ट्रार व समभाग हस्तांतरण एजंट (**''केफिनटेक''**) यांच्या वेबसाईटवर **https://evoting.kfintech.com** येथे पाहता येतील व डाऊनलोड करता येतील.

दुसऱ्या याचिकाकर्ता कंपनीचे इक्विटी भागधारक योजनेची छापील प्रत आणि कायद्यातील कलम १०२ आणि इतर लागू तरतुदींसोबत वाचले असता कलम २३० आणि २३२ आणि सीएए नियमांमधील नियम ६ अन्वये विवरणाची छापील प्रत मोफत मिळवू शकतील. दुसऱ्या याचिकाकर्ता कंपनीचे अधिकृत स्वाक्षरीकर्ता यांना Sridhar.Kothandaraman@ril.com येथे ह्या संदर्भात लेखी विनंती पाठवावी.

न्यायासनाने श्री. आदिल झैनुलभाई यांची, त्यांच्या अनुपस्थितीत श्री. दिलीप चिनुभाई चोक्सी, चार्टर्ड अकौन्टन्ट, यांची दुसऱ्या याचिकाकर्ता कंपनीच्या इक्विटी भागधारकांच्या सभेचे चेअरपरसन म्हणून नेमणूक केली आहे. श्री. अनिल लोहिया आणि त्यांच्या अनुपस्थितीत, श्री. चंद्रहास दयाळ, चार्टर्ड अकौन्टन्ट, मेसर्स दयाळ अ‍ॅण्ड लोहिया हे वरील सभेसाठी स्क्रुटिनायजर म्हणून काम करतील. वरील योजना, वरील सभेत मंजूर करण्यात आल्यास ती न्यायासनाच्या मंजुरीच्या आणि सदर इतर मंजुऱ्या, परवानग्या आणि नियामक प्राधिकारी किंवा इतर प्राधिकाऱ्यांच्या, आवश्य असेल त्यानुसार मंजुरीच्या अधीन असेल.

वरील सभेस उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र व्यक्ती सभेच्या अगोदर त्यांचे संबंधित मतदान करण्यासाठी दूरस्थ ई–मतदान पद्धतीने मतदान करू शकतात किंवा संबंधित सभेमध्ये ई–मतदान पद्धतीने मतदान करू शकतील. इक्विटी भागधारक, यांच्या सभा व्हीसी/ओएव्हीएम पद्धतीने घेण्यात येत असल्यामुळे इक्विटी भागधारक, यांची प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक नाही. त्यानुसार, संबंधित सभेसाठी इक्विटी भागधारक द्वारा प्रॉक्सीजची नेमणूक करण्याची सुविधा उपलब्ध नाही.

वरील सभेसाठी अंतिम मुदतीची तारीख आणि दूरस्थ ई–मतदानाचा कालावधी खालील प्रमाणे आहे:

| इक्विटी भागधारकांची सभा | |
|---|---|
| ई–मतदानासाठी कट ऑफ तारीख | मंगळवार, २३ नोव्हेंबर, २०२१ |
| दूरस्थ मतदान सुरू होण्याची तारीख व वेळ | गुरुवार, २५ नोव्हेंबर, २०२१ रोजी सकाळी ९.०० (भाप्रवेळ) |
| दूरस्थ मतदान बंद होण्याची तारीख व वेळ | सोमवार, २९ नोव्हेंबर, २०२१ रोजी सायंकाळी ५.०० (भाप्रवेळ) |

कट ऑफ तारखेला म्हणजे मंगळवार, २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी ज्यांची नावे सदस्यांच्या रजिस्टरमध्ये किंवा लाभधारक मालकांच्या रजिस्टरमध्ये आहेत असेच इक्विटी भागधारक फक्त सूचनेत प्रस्तावित असलेल्या ठरावांवर त्यांच्या/तिच्या/त्याच्या मतदानाचा अधिकार वापरण्यास पात्र असतील आणि इक्विटी भागधारकांच्या सभेला उपस्थित राहण्यास पात्र असतील. इक्विटी भागधारकांचा/लाभधारक मालकांचा मतदानाचा अधिकार (इलेक्ट्रॉनिक समभागधारणेच्या बाबतीत) हा कट ऑफ तारखेला म्हणजे मंगळवार, २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी दुसऱ्या याचिकाकर्ता कंपनीच्या भरणा केलेल्या इक्विटी भागभांडवलातील त्यांच्या/तिच्या/त्याच्या समभागधारणेच्या प्रमाणात असेल.

इक्विटी भागधारक, यांना योजनेच्या संदर्भात किंवा वरील सभांमध्ये विचाराधीन असलेल्या प्रस्तावित विषयांबद्दल काही माहिती हवी असल्यास, त्यांना सभेच्या तारखेच्या ७ (सात) दिवस अगोदर कंपनीला ई–मेल द्वारे Sridhar.Kothandaraman@ril.com येथे लिहिण्याची विनंती करण्यात येत आहे.

स्वाक्षरी/–
आदिल झैनुलभाई
दुसऱ्या याचिकाकर्ता कंपनीच्या इक्विटी भागधारक सभांसाठी नियुक्त चेअरपरसन

दिनांक: शनिवार, ३० ऑक्टोबर, २०२१

## रिलायन्स रिटेल व्हेन्चर्स लिमिटेड

CIN: U51909MH2006PLC166166
नोंदणीकृत कार्यालय: ४था मजला, कोर्ट हाऊस, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई – ४०० ००२. महाराष्ट्र
दूरध्वनी: +९१ २२ ३५५५३८०० • ई–मेल: Sridhar.Kothandaraman@ril.com • वेबसाईट: www.relianceretail.com

**कंपनी योजना याचिका क्र. सीए (सीएए) क्र.०९/एमबी/२०२१**

**फ्युचर कंझ्युमर लिमिटेड, फ्युचर लाईफस्टाईल फॅशन्स लिमिटेड, फ्युचर मार्केट नेटवर्कस लिमिटेड, फ्युचर रिटेल लिमिटेड, फ्युचर सप्लाय चेन सोल्यूशन्स लिमिटेड, फ्युचरबाजार इंडिया लिमिटेड, अ‍ॅक्युट रिटेल इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड, बासुती सेल्स अ‍ॅण्ड ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड, ब्रॅटल फुडस प्रायव्हेट लिमिटेड, चिराग ऑपरेटिंग लीज कं. प्रायव्हेट लिमिटेड, हरे कृष्णा ऑपरेटिंग लीज प्रायव्हेट लिमिटेड, नाईस टेक्सकोट ट्रेडिंग अ‍ॅण्ड एजन्सी प्रायव्हेट लिमिटेड, निष्ता मॉल मॅनेजमेंट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, ओजस ट्रेडलीज अ‍ॅण्ड मॉल मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड, प्रिसिजन रिअ‍ॅल्टी डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड, रिवाझ ट्रेड व्हेन्चर्स प्रायव्हेट लिमिटेड, सिंटेक्स ट्रेडिंग अ‍ॅण्ड एजन्सी प्रायव्हेट लिमिटेड, टॅक्युटो लीज ऑपरेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, युनिक मॉल्स प्रायव्हेट लिमिटेड, फ्युचर एंटरप्रायझेस लिमिटेड आणि त्यांचे संबंधित भागधारक व क्रेडिटर्स (''भाग १'') आणि फ्युचर एंटरप्रायझेस लिमिटेड व रिलायन्स रिटेल व्हेन्चर्स लिमिटेड व त्यांचे संबंधित भागधारक व क्रेडिटर्स (''भाग २'') आणि फ्युचर एंटरप्रायझेस लिमिटेड आणि रिलायन्स रिटेल अ‍ॅण्ड फॅशन लाईफस्टाईल लिमिटेड व त्यांचे संबंधित भागधारक व क्रेडिटर्स (''भाग ३'') यांच्यातील एकत्रित योजनेच्या व्यवस्थेच्या प्रकरणी**

रिलायन्स रिटेल व्हेन्चर्स लिमिटेड, कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत नोंदणी करण्यात आलेली कंपनी जिचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक: U51909MH2006PLC166166 आहे आणि तिचे नोंदणीकृत कार्यालय ४था मजला, कोर्ट हाऊस, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई – ४०० ००२, महाराष्ट्र, भारत येथे आहे. ) ... पहिली याचिकाकर्ता कंपनी

### पहिली याचिकाकर्ता कंपनीचे इक्विटी भागधारक यांच्या सूचनेची सूचना व जाहिरात

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायासनाच्या (**''न्यायासन''**) मुंबई खंडपीठाने आपल्या दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१ च्या आदेशान्वये (**''न्यायासनाचा आदेश''**), कंपनी कायदा, २०१३ (**''कायदा''**) मधील कलम २३० ते २३२ आणि इतर लागू तरतुदींच्या अंतर्गत फ्युचर कंझ्युमर लिमिटेड, फ्युचर लाईफस्टाईल फॅशन्स लिमिटेड, फ्युचर मार्केट नेटवर्कस लिमिटेड, फ्युचर रिटेल लिमिटेड, फ्युचर सप्लाय चेन सोल्यूशन्स लिमिटेड, फ्युचरबाजार इंडिया लिमिटेड, अ‍ॅक्युट रिटेल इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड, बासुती सेल्स अ‍ॅण्ड ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड, ब्रॅटल फुडस प्रायव्हेट लिमिटेड, चिराग ऑपरेटिंग लीज कं. प्रायव्हेट लिमिटेड, हरे कृष्णा ऑपरेटिंग लीज प्रायव्हेट लिमिटेड, नाईस टेक्सकोट ट्रेडिंग अ‍ॅण्ड एजन्सी प्रायव्हेट लिमिटेड, निष्ता मॉल मॅनेजमेंट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, ओजस ट्रेडलीज अ‍ॅण्ड मॉल मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड, प्रिसिजन रिअ‍ॅल्टी डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड, रिवाझ ट्रेड व्हेन्चर्स प्रायव्हेट लिमिटेड, सिंटेक्स ट्रेडिंग अ‍ॅण्ड एजन्सी प्रायव्हेट लिमिटेड, टॅक्युटो लीज ऑपरेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, युनिक मॉल्स प्रायव्हेट लिमिटेड, फ्युचर एंटरप्रायझेस लिमिटेड आणि त्यांचे संबंधित भागधारक व क्रेडिटर्स आणि फ्युचर एंटरप्रायझेस लिमिटेड व रिलायन्स रिटेल व्हेन्चर्स लिमिटेड व त्यांचे संबंधित भागधारक व क्रेडिटर्स, फ्युचर एंटरप्रायझेस लिमिटेड आणि रिलायन्स रिटेल अ‍ॅण्ड फॅशन लाईफस्टाईल लिमिटेड व त्यांचे संबंधित भागधारक व क्रेडिटर्स यांच्यातील प्रस्तावित एकत्रित योजनेच्या व्यवस्थेवर (**''योजना''**) विचार करण्यासाठी, आणि योग्य वाटल्यास, बदलांसह किंवा त्याशिवाय, त्यास मंजुरी देण्यासाठी, मंगळवार, ३० नोव्हेंबर, २०२१ रोजी दुपारी २.०० वाजता (भाप्रवेळ) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (**''व्हीसी''**) आणि इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे (**''ओएव्हीएम''**) पहिल्या याचिकाकर्ता कंपनीच्या इक्विटी भागधारकांची सभा बोलाविण्याचे आदेश दिले आहेत.

योजनेची प्रत, कायद्यातील कलम १०२ आणि कायद्यातील इतर लागू तरतुदींसोबत वाचले असता कलम २३० ते २३२ अन्वये आणि कंपन्या (समझोते, व्यवस्था आणि विलिनिकरण) नियम, २०१६ (**''सीएए नियम''**) मधील नियम ६ अन्वये विवरण आणि सोबतचे इतर दस्तऐवज पहिल्या याचिकाकर्ता कंपनीच्या वेबसाईटवर www.relianceretail.com येथे आणि केफिन टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड, पहिल्या याचिकाकर्ता कंपनीचे रजिस्ट्रार व समभाग हस्तांतरण एजंट (**''केफिनटेक''**) यांच्या वेबसाईटवर **https://evoting.kfintech.com** येथे पाहता येतील व डाऊनलोड करता येतील.

पहिल्या याचिकाकर्ता कंपनीचे इक्विटी भागधारक कायद्यातील कलम १०२ आणि कायद्यातील इतर लागू तरतुदींसोबत वाचले असता कलम २३० ते २३२ अन्वये आणि सीएए नियम मधील नियम ६ अन्वये योजना आणि विवरण यांची छापील प्रत मोफत मिळवू शकतील. ह्या संदर्भात याचिकाकर्ता कंपनीचे कंपनी सेक्रेटरी यांना Sridhar.Kothandaraman@ril.com येथे लेखी विनंती पाठवावी.

न्यायासनाने श्री. आदिल झैनुलभाई, पहिल्या याचिकाकर्ता कंपनीचे स्वतंत्र संचालक, त्यांच्या अनुपस्थितीत श्री. दिलीप चीनुभाई चोक्सी, चार्टर्ड अकौन्टन्ट यांची पहिल्या याचिकाकर्ता कंपनीच्या इक्विटी भागधारकांच्या सभेसाठी चेअरपरसन म्हणून नेमणूक केली आहे. श्री. अनिल लोहिया आणि त्यांच्या अनुपस्थितीत, श्री. चंद्रहास दयाळ, चार्टर्ड अकौन्टन्ट, मेसर्स दयाळ अ‍ॅण्ड लोहिया हे वरील सभेसाठी स्क्रुटिनायजर म्हणून काम करतील. वरील योजना, वरील सभेत मंजूर करण्यात आल्यास ती न्यायासनाच्या मंजुरीच्या आणि सदर इतर मंजुऱ्या, परवानग्या आणि नियामक प्राधिकारी किंवा इतर प्राधिकाऱ्यांच्या, आवश्य असेल त्यानुसार मंजुरीच्या अधीन असेल.

वरील सभेस उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र व्यक्ती सभेच्या अगोदर त्यांचे संबंधित मतदान करण्यासाठी दूरस्थ ई–मतदान पद्धतीने मतदान करू शकतात किंवा संबंधित सभेमध्ये ई–मतदान पद्धतीने मतदान करू शकतील. इक्विटी भागधारक, यांच्या सभा व्हीसी/ओएव्हीएम पद्धतीने घेण्यात येत असल्यामुळे इक्विटी भागधारक, यांची प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक नाही. त्यानुसार, संबंधित सभेसाठी इक्विटी भागधारक द्वारा प्रॉक्सीजची नेमणूक करण्याची सुविधा उपलब्ध नाही.

वरील सभेसाठी अंतिम मुदतीची तारीख आणि दूरस्थ ई–मतदानाचा कालावधी खालील प्रमाणे आहे:

| इक्विटी भागधारकांची सभा | |
|---|---|
| ई–मतदानासाठी कट ऑफ तारीख | मंगळवार, २३ नोव्हेंबर, २०२१ |
| दूरस्थ मतदान सुरू होण्याची तारीख व वेळ | गुरुवार, २५ नोव्हेंबर, २०२१ रोजी सकाळी ९.०० (भाप्रवेळ) |
| दूरस्थ मतदान बंद होण्याची तारीख व वेळ | सोमवार, २९ नोव्हेंबर, २०२१ रोजी सायंकाळी ५.०० (भाप्रवेळ) |

कट ऑफ तारखेला म्हणजे मंगळवार, २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी ज्यांची नावे सदस्यांच्या रजिस्टरमध्ये किंवा लाभधारक मालकांच्या रजिस्टरमध्ये आहेत असेच इक्विटी भागधारक फक्त सूचनेत प्रस्तावित असलेल्या ठरावांवर त्यांच्या/तिच्या/त्याच्या मतदानाचा अधिकार वापरण्यास पात्र असतील आणि इक्विटी भागधारकांच्या सभेला उपस्थित राहण्यास पात्र असतील. इक्विटी भागधारकांचा/लाभधारक मालकांचा मतदानाचा अधिकार (इलेक्ट्रॉनिक समभागधारणेच्या बाबतीत) हा कट ऑफ तारखेला म्हणजे मंगळवार, २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी पहिल्या याचिकाकर्ता कंपनीच्या भरणा केलेल्या इक्विटी भागभांडवलातील त्यांच्या/तिच्या/त्याच्या समभागधारणेच्या प्रमाणात असेल.

इक्विटी भागधारक, यांना योजनेच्या संदर्भात किंवा वरील सभांमध्ये विचाराधीन असलेल्या प्रस्तावित विषयांबद्दल काही माहिती हवी असल्यास, त्यांना सभेच्या तारखेच्या ७ (सात) दिवस अगोदर कंपनीला ई–मेल द्वारे Sridhar.Kothandaraman@ril.com येथे लिहिण्याची विनंती करण्यात येत आहे.

स्वाक्षरी/–
आदिल झैनुलभाई
पहिल्या याचिकाकर्ता कंपनीच्या इक्विटी भागधारक सभांसाठी नियुक्त चेअरपरसन

दिनांक: शनिवार, ३० ऑक्टोबर, २०२१